दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२४४ बुधवार,दि.०७ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-244 | Wednesday, Dt.07 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा मार्ग मोकळा

## सर्वोच्च न्यायालयाचा राज्य सरकारला दणका

प्रतिनिधी । नवी दिल्ली

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. चार महिन्याच्या आत निवडणुका घ्या असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक ठराविक वेळेत घ्या. उर्वरित वादाचे मुद्दे टाळण्याचे सर्वो च्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. आधीच्या परिस्थितीनुसार १९९४ ते २०२२ च्या परिस्थितीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक निर्णय घेतले जातील. राज्य सरकारला आणि निवडणूक आयोगाला सप्टेंबरच्या आत निवडणूक घ्यायची आहे असं वकील सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितलं.

कोरोना संकटामुळे मुंबई महापालिकेसह इतर महापालिकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. प्रशासकाद्वारे या सर्व महापालिकांचा कारभार चाललेला. याविरोधात डिसेंबर २०२१ मध्ये राहुल वाघ यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर तब्बल चार वर्षांनंतर न्या. सूर्यकांत आणि न्या. नाँगमेईकपम यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या - निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घ्यायच्याच नाहीत का ? असा सवाल उपस्थित करत निवडणुका घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच विशिष्ट प्रकरणात वेळ वाढवून 'मागण्याची मुभा असेल, असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. आज पंचायत निवडणुकीसंदर्भात ओबीसी आरक्षणावर सुनावणी झाली.निवडणुका अडवून ठेवण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. न्यायालयाने सांगितले की, ओबीसी आरक्षणाबाबत २०२२ च्या आधीची परिस्थिती होती, ती परिस्थिती कायम ठेवावी. याचिकाकर्त्यांनी म्हटले होते की, २०२२ मध्ये



अहवाल आला त्यामध्ये ओबीसींच्या जागा कमी करण्यात आल्या. त्यामुळे न्यायालयाने २०२२ पूर्वीची परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले.

राज्यात पाच वर्षपेक्षा अनेक प्रकरणात प्रशासक कार्यरत आहे. लोकप्रतिनिधींनी स्थानिक स्वराज्य संस्थां चालवल्या पाहिजेत अशी राज्यघटनेत तरतूद आहे. पण त्या विपरीत हे सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयानेही सांगितलं की, औरंगाबाद आणि नवी मुंबईत पाच वर्षपेक्षा अधिक काळ प्रशासकांचा आहे. न्यायालयाने असंही सांगितल की, आमच्यासमोर अनेक केसेस आल्या. लोकनियुक्त प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेत असले पाहिजे असं वकील देवदत्त पालोदकर यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात मागच्या तीन वर्षांपासून स्थानिक संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. यात महापालिका, जिल्हा परिषद,नगर पंचायतींचा समावेश होतो. मागच्यावर्षी निवडणुका पार पडल्या. केंद्रात पुन्हा एकदा मोदी सरकार सत्तेवर आलं, तर महाराष्ट्रात महायुती सरकारने सत्ता मिळवली. राज्यात सर्वच पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची मागच्या काही दिवसांपासून तयारी सुरु केली आहे. स्थानिक संस्थांमध्ये वर्चस्व मिळवण्यासाठी त्या दृष्टीने सत्ताधारी पक्षाकडून रणनिती आखली जात आहे.

### न्यायालयाने केलेल्या सूचना :

१) स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीबाबत चार आठवड्यात नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या.
२) १९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसारच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घ्या.
३) राज्य सरकारला आणि राज्य निवडणूक आयोगने दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी.
४) ओबीसींच्या जागा कमी होत्या हा याचिकाकर्त्यांचा दावा होता, त्यावर कोटनि २०२२ पूर्वीची स्थिती कायम

# ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने १० मे रोजी परळीत आगळावेगळा सामूहिक विवाह सोहळा

प्रतिनिधी @ परळी

ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने ११ गरीब कुटुंबातील जोडप्यांचा आगळा वेगळा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या बाजूला असलेल्या हलगे गार्डन येथे दिनांक १० मे रोजी दुपारी १२.३० वाजता या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, जवळपास ४ हजार पाहुणेमंडळी या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत.ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक मयंक गांधी यांच्या वतीने परळी तालुक्यात मोठी सामाजिक चळवळ उभी करण्यात आली आहे. ट्रस्टच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात. याच ट्रस्टच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप खेरुका यांचे कुटुंब, त्यांच्या कन्या अलकनंदा रूईया आणि जावई यांच्या वतीने ११ गरीब जोडप्यांच्या विवाहासाठी १५ लक्ष रुपयांची मदत देण्यात आली आहे. लंडन येथे झालेल्या लग्न सोहळ्याच्या निमित्ताने ही देणगी संबंधित कुटुंबाने दिली आहे. आजमितीस अनेक अशी कुटुंबे आहेत ज्यांना की मुलींच्या लग्नाचा भर झेपत नाही. यातूनच अनेकांच्या आत्महत्या होतांना ग्लोबल विकास ट्रस्टने अनुभवलेले आहे. या समस्यांवर उपाय म्हणून हा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न होत आहे. या विवाह सोहळ्यात हुंडा न देण्याची आणि न घेण्याची शपथ दिली जाणार आहे. ग्लोबल विकास ट्रस्टकडून नवदाम्पत्याला सर्व संसारोपयोगी साहित्य भेट म्हणून दिले जाणार असून, प्रत्येक जोडप्याच्या नावे संयुक्तरीत्या ७० हजार रुपयांच्या मुदत ठेव प्रमाणपत्र त्यांना दिले जाणार आहे. या आगळ्यावेगळ्या सामुदायिक विवाह सोहळ्यास सुमारे चार हजार पाहुणेमंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

### हुंडा न देण्याची आणि न घेण्याची दिली जाणार शपथ; चार हजार पाहुण्यांची असणार उपस्थिती

# देगलूर तालुक्यातील तमलूरचा सचिन वनंजे शूर पुत्र देशासाठी शहीद

देगलूर/प्रतिनिधी

काश्मीरच्या तुफानी थंडीमध्ये देशसेवेचे व्रत जोपासणारे तमलूर (ता. देगलूर) गावचे सुपुत्र जवान सचिन यादव वनंजे (वय ३०) यांनी आज देशासाठी आपले प्राण अर्पण केले. दुपारी १२ ते १ च्या सुमारास ड्युटीवर असताना त्यांचे वीरमरण झाले. या दुःखद घटनेने संपूर्ण देगलूर तालुका शोकमग्न झाला आहे.



शहीद सचिन वनंजे हे लहानपणापासूनच राष्ट्रसेवेसाठी प्रेरित होते. देशभक्तीची ठिणगी त्यांच्या मनात लहान वयातच चेतली होती. त्यांनी भारतीय सैन्यदलात भरती होऊन अनेक वर्षे देशसेवा केली. कर्तव्यपरायणता आणि शिस्त हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मुख्य गुण होते.त्यांच्या पश्चात पत्नी, आठ महिन्यांची चिमुकली मुलगी, दोन भाऊ आणि आई-वडील असा त्यांचा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

त्याग आणि बलिदान हेच खरे शौर्याचे प्रतीक असते.

सचिन वनंजे यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देशासाठी अजरामर इतिहास लिहिला. त्यांचे नाव आणि त्यांचे शौर्य कधीही विसरले जाणार नाही. तमलूर गावाचा हा वीरपुत्र कायमच्या स्मृतीत राहील.

# पाकिस्तानवर हवाई हल्ला, ९ दहशतवादी तळं उद्ध्वस्त, भारताची मोठी कारवाई

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारतीय सैन्याकडून जशास तसं उत्तर देण्यात आलं आहे. भारताकडून बुधवारी मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे ९ अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत.

या क्षणाची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात भारतातील २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. भारताने या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेत पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून आहे. भारताने शेजारी देशासह सुरू असलेल्या या तणावादरम्यान बुधवारी मध्यरात्री (७ मे) पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्रे डागली आहेत. भारतीय सैन्याने पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या १५ दिवसांनी ही कारवाई केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले आहेत. ही तीच ठिकाणे आहेत जिथून भारतावर दहशतवादी हल्ले करण्याचे निर्देश दिले गेले होते. दरम्यान या हल्ल्यात काय काय नुकसान झालंय, याबाबत माहिति समजू शकलेली नाही. भारतीय सैन्य दलाकडून 'ऑपरेशन सिंदूर' नुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

भारतीय सैन्य दलाकडून हवाई हल्ल्याआधी सोशल मीडियावरुन एक पोस्ट करण्यात आली होती. प्रहाराय सन्निहिताः, जयाय प्रशिक्षिताः आणि Ready to Strike, Trained to Win, अशा आशयाची पोस्ट करण्यात आली होती. त्यानुसार काही वेळातच पहलगाम हल्ल्याचा हिशोब चुकता केला जाणार असल्याचं स्पष्ट झालं होतं. सैन्य दलाने केलेल्या या कारवाईचं आता सर्वच स्तरातून कौतुक केलं जात आहे.

भ्याड हल्ल्यात निष्पाप भारतीयांचा मृत्यू दरम्यान पहलगाममध्ये २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर धर्म विचारुन गोळीबार केला होता. त्या भ्याड हल्ल्यानंतर भारतात संतापाची लाट होती. पाकड्यांना जशास तसं उत्तर द्यावं, अशी मागणी भारतीयांची होती. अखेर भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानवर हवाई हल्ला करत शेजाऱ्यांच्या नांग्या ठेचल्या आहेत.




### पाकिस्तानवर डिजीटल स्ट्राईक

दरम्यान भारताकडून पहलगााम हल्ल्यानंतर पाकिस्तानमधील कलाकार आणि क्रीडापटूंच्या सोशल मीडिया खात्यांवर भारतात बंदी टाकण्यात आली. शाहिद आफ्रिदी, शोएब अख्तर या माजी पाकिस्तान क्रिकेटपटूंच्या यूट्युब चॅनेलवर भारतात बंदी टाकून त्यांची आर्थिक कोंडी करण्यात आली.

### 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तान हादरलं

भारतीय सैन्य दलाच्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईनंतर पाकिस्तान हादरलं आहे. भारताने मुजफ्फराबाद, कोटली आणि बहावलपूरमध्ये मोठा क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. पाकिस्तानी माध्यमांच्या दाव्यानंतर काही वेळातच भारत सरकारनेही या हल्ल्याची अधिकृतपणे पुष्टी केली.

# शासन आणखी किती जणांचे बळी घेणार?

## खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग दुरावस्था; युवा नेते तौफीक पटेल यांचा उद्विग्न सवाल

माजलगाव : तालुक्यातून जात असलेल्या खामगाव-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्ग धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत अक्षरशः मृत्यूचा सापळा निर्माण झाला आहे. या ठिकाणी जवळपास पाच ते सहा जणांचे नाहक बळी गेले आहेत. तर शेकडो जण गंभीर जखमी झाले आहेत. सरकार आणखी किती जणांचे बळी घेणार आहे, असा उद्विग्न सवाल माजलगाव नगर परिषदेचे माजी सभापती तौफीक पटेल यांनी विचारला आहे.

खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग माजलगाव तालुक्यातून जातो. धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत रस्त्याच्या मधोमध मोठमोठ्या भेगा पडलेल्या आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याला तडे गेलेले आहेत. या प्रकारामुळे मागील काही वर्षांत पाच ते सहा जणांचे बळी गेलेले आहेत. यात नामांकित ॲड.घुबडे आणि अभियंता शेजुळ यांचा समावेश होतो. त्याचबरोबर शेकडो दुचाकीस्वार पडल्याने त्यांना गंभीर दुखापत झालेली आहे. या रस्त्यावरून शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी दुचाकीवरून ये-जा करतात. मात्र रस्त्याला पडलेल्या मोठमोठ्या भेंगामुळे दुचाकीस्वार अडकून पडल्याच्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत. याकडे तौफीक पटेल यांनी शासनाचे लक्ष वेधले. शासन आणखी किती जणांचे बळी घेणार आहेत? असा रास्त सवाल पटेल यांनी व्यक्त केला. धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंतच रस्त्याची एवढी दुरावस्था का झाली? याबद्दल शंकाही तौफीक पटेल यांनी व्यक्त केली. या रस्त्याच्या दुरावस्थेला जे जबाबदार आहेत. त्यांची कसून चौकशी करण्याची मागणीही तौफीक पटेल यांनी लावून धरली आहे. रस्त्याची तातडीने डागडुजी करण्यात यावी, जेणेकरून जनसामान्य लोकांना दिलासा मिळेल शासन आणखी किती जणांचा बळी घेणार आहे? असा उद्विग्न सवाल तौफीक पटेल यांनी विचारला आहे.



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# अंथरवन पिंपरी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून १२ वी परीक्षेत मोनिका सिरसाट प्रथम!

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ८२.१७ टक्के गुण संपादन करून मिळविले घवघवीत यश!

**बीड (प्रतिनिधी)**

**शहरापासून जवळच असलेल्या अंथरवन पिंपरी तांडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेची विद्यार्थिनी मोनिका राजेभाऊ सिरसाट हिने इयत्ता १२ वी (कला शाखा) परीक्षेत ८२.१७ टक्के गुण घेत घवघवीत यश संपादन करून माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल तिचे आईवडील, कॉलेज प्रशासन, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी अभिनंदन केले आहे.**

माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील रहिवासी असणारे अशिक्षित परंतु मोठं कुटुंब या मोठ्या कुटुंबात गरिबी परिस्थिती असतानाही खचून न जाता दिवस-रात्र काबाडकष्ट मेहनत करून



आपल्या लाडक्या सात ही कन्यांचे शिक्षण आणि त्यांचे यशस्वी संगोपन, विवाह करणाऱ्या राजाभाऊ सिरसाट आणि त्यांच्या पत्नी सौ. लता सिरसाट या दांम्पत्याने आपल्या सातही मुलींना उच्च शिक्षण दिले. काही मुलींचे विवाह करून त्यांचा सुखाचा संसार सुरू करून दिला. सातव्या क्रमांकाची मुलगी कु. मोनिका हिला विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा होता. परंतु परिस्थितीमुळे तिला विज्ञान शाखेला प्रवेश घेता आला नाही. दरम्यान तिने कला शाखेत प्रवेश घेऊन परिस्थितीवर मात करून हलाकीच्या परिस्थितीत प्रचंड अभ्यास करून परिस्थितीवर मात केली. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेमध्ये मोनिका सिरसाट हिने ८२.१७ टक्के गुण संपादित करून अंथरवन पिंपरी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून तिने प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या घवघवीत यशाबद्दल तिचे आईवडील, संस्थेचे संस्थाचालक दिनेश पवार साहेब, प्राचार्य खंदारे सर, प्रा.पवार सर, प्रा.सिरसाट सर, प्रा. आखाडे सर, प्रा. श्रीमती तांबे मॅडम, प्रा.श्रीमती लगसकर मॅडम, सहशिक्षिका श्रीमती कांबळे मॅडम, सहशिक्षिका श्रीमती खंदारे मॅडम यांच्यासह सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

# 'तलावांचे पुनरुज्जीवन' कामांना वेग शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व गावांनी पुढे यावे

**प्रतिनिधी @ केज**

गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण हि योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या योजनेचा प्रचार प्रसार करण्याचे काम भारतीय जैन संघटना करीत आहे. या योजनेच्या प्रचार रथाचे उद्घाटन आज दिनांक ५ मे रोजी जिल्हाधिकारी श्री. विवेकजी जॉन्सन व अप्पर जिल्हाधिकारी श्री हरिष धार्मिक यांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे पार पडले यावेळी उपस्थित जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री संजय आमले, सहाय्यक जलसंधारण अधिकारी श्री शुभम हासबे, जलसंधारण अधिकारी सचिन ठोंबरे सर्व मृदू व जलसंधारण विभाग बीड तसेच भारतीय जैन संघटनेचे सकल जैन समाज अध्यक्ष प्रेमचंदजी लोढा, समाजरत्न विजयराज बंब भाजपा शहराध्यक्ष अशोक लोढा, इगड जिल्हा अध्यक्ष अमित पगारिया, जिल्हा सचिव सुशील मुनोत, जिल्हा उपाध्यक्ष राजु संचेती, बाबुशेठ खिवसरा, राजेंद्र मुनोत, गौतम खटोड, आशिष जैन, प्रविण बोरा, मदन दुग्गड, सुशील खटोड, सचिन लोढा, सचिन



कांकरिया, निलेश ललवाणी, आनंद ललवाणी, अक्षय लोढा इगड जिल्हा समन्वयक जयराम शिंदे आदी.

महाराष्ट्र शासनाच्या 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या महत्वाकांक्षी योजनेचे राज्यात युद्धपातळीवर काम सुरू झाले आहे. प्रत्येक गावागावात जाऊन या योजनेचा जलरथद्वारे प्रचार-प्रसार तथा जनजागृती केली जात आहे. या जलरथांना राज्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. तसेच ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण जिल्हा, तालुका पातळीवर मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. जिल्हाधिकारी, झेडपी सीईओ, जलसंधारण अधिकारी, गट विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली सरपंच, ग्रामसेवक, शेतकरी यांना ऑडिओ, व्हिडिओ, पीपीटी सादरीकरण या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जात आहे.

आतापर्यंत या योजनेचा प्रचार-प्रसार करणार्या जलरथाचे उद्घाटन राज्यातील २३ जिल्ह्यात संपन्न झाले. यात अहिल्यानगर, अकोला, भंडारा, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, जळगाव, जालना, नंदुरबार, सांगली, सातारा, सोलापूर, वाशिम, यवतमाळ, धुळे, वर्धा, अमरावती, धाराशीव, गडचिरोली, लातूर, गोंदिया, कोल्हापूर, नागपूर आदी जिल्ह्यांचा समावेश आहे.

'योजनेची सर्व माहिती तसेच अर्ज करण्यासाठी 'गाळमुक्त धरण' म्हणजेच '्.िहळुररी.ले' या शासनाच्या पोर्टलला भेट द्यावी. डिमांड जनरेशनया टॅबवरुनमागणी अर्जडाउनलोड करून भरलेला अर्ज'बीजेएस ॲप'वर अपलोड करावा. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा,' असे आवाहन मृद व जलसंधारण विभागाचे मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक तसेच सचिव गणेश पाटील यांनी केले आहे.

सदरील योजनेद्वारे शासन गावागावांतील तलावांमधील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणार आहे. गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे.

शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकर्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहन देणे, जनजागृती करून जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज निर्माण करणे तसेच 'गाळमुक्त धरण' पोर्टलची निर्मिती करण्यासाठी भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे.

बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षित जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्रातील बीजेएसचे हजारो कार्यकर्ते हे बीजेएसच्या माध्यमातून शेतकर्यांना, ग्रामपंचायतींना, तालुका-जिल्हा प्रशासनाला सहयोग करीत आहेत. या योजनेच्या जनजागृतीसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे.

# केजमधे नीट ची परीक्षा सुरळीतपणे पडली पार

**प्रतिनिधी @ केज**

केज शहरातील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या शारदा ईंग्लिश स्कूल या नामांकित शाळेमध्ये यावर्षी पहील्यांदाच नीट -२०२५ ची परिक्षा झाली.अत्यंत चोख पोलीस बंदोबस्तात ही परीक्षा सुरळीतपणे




पार पडली. मेडिकल क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची परीक्षा म्हणून नीट परीक्षेकडे सध्या अनेक विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर ओढा आहे. यामुळे या परीक्षेला प्रत्येक केंद्रावर तोबा गर्दी होत असते.यावर्षी पहिल्यांदाच केज शहरा मध्ये देखील ही परीक्षा झाली.छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या शारदा ईंग्लिश स्कूल या नामांकित शाळेमध्ये चोख पोलीस बंदोबस्तात ही परीक्षा सुरळीतपणे पार पडली आहे.सुसज्ज,टोलेजंग इमारत आणि उत्तम नियोजन यामुळे या ठिकाणी ४८० विद्यार्थ्यांची परीक्षा सुरळीतपणे पार पडली आहे.केज शहरामध्ये यावर्षी शारदा ईंग्लिश स्कूलमध्ये हे परीक्षा केंद्र आल्यामुळे या भागातील विद्यार्थी आणि पालकांनी आनंद व्यक्त केला आहे.



# बोगस शिक्षक निघाला नक्षलवादी

## एटीएसने पुण्यातून केली अटक; खालापुरात उडाली खळबळ

गडब/सुरेश म्हात्रे

नक्षलवाद्यांशी संबंधित गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असलेला कुख्यात आरोपी प्रशांत जालिंदर कांबळे ऊर्फ 'लॅपटॉप' डोणवत गावात 'सुनील जगताप' या बनावट नावाने राहात होता. आदिवासी पाड्यांमध्ये मुलांना शिकवण्याचे ढोंग करत आपली खरी ओळख लपवत होता. मात्र, पुणे एटीएस युनिटने अत्यंत गुप्त पद्धतीने माहिती मिळवून ३ मे रोजी त्याच्यावर सापळा रचून त्याला ताब्यात घेऊन ४ मे रोजी अधिकृतपणे अटक केली आहे. देवमाणसाच्या रूपात खालापुरात वावणारा शिक्षक नक्षलवादी असल्याचे समजताच सर्वत्र खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांशी संबंधित गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असलेला कुख्यात आरोपी प्रशांत जालिंदर कांबळे याच्यावर मुंबईतील काळाचौकी पोलीस ठाण्यात २०११ साली गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात तो तब्बल १४ गंभीर कलमांखाली आरोपी होता आणि त्याला न्यायालयाने फरार घोषित करत निरंतर अटक वॉरंट

**तो लॅपटॉप दुरुस्त करायचा**

पुण्यातील ताडीवाला परिसरातील रहिवासी प्रशांत कांबळे हा लॅपटॉप दुरुस्तीचे काम करीत होता. तो माओवाद्याच्या संपर्कात आला. नोव्हेंबर २०१० मध्ये मुंबईला कामानिमित्त जाण्याचे कारण सांगून तो घरातून निघून गेला, मात्र परतला नाही. त्याच्या कुटुंबियांनी १८ जानेवारी २०११ रोजी बंडगार्डन पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. तो गडचिरोलीत माओवादी संघटनेचा सक्रिय सदस्य असल्याचे समोर आल्यानंतर त्याला वॉन्टेड आरोपी दाखविण्यात आले होते.

# आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## सर्व स्तरातून होतोय अभिनंदनचा वर्षाव!

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील यशवंत विद्यालयात कार्यरत असणाऱ्या विद्यार्थी प्रिय शिक्षिका श्रीमती मीरा बबनराव लांडगे मॅडम यांना या वर्षीचा पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला होता. रविवार दिनांक ४ मे रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते सदरील पुरस्कार देऊन श्रीमती लांडगे मॅडम यांना सन्मानित करण्यात आले. सदरील आदर्श राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीमती मीरा लांडगे मॅडम यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. बीड शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने मागील १७ वर्षापासून संविधान दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणीजणांचा पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने पद्मपाणि राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. या वर्षीच्या दिल्या जाणाऱ्या विविध राज्य राष्ट्रीय पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध क्षेत्रातील गुणवंत आणि कर्तुत्ववान गुणीजणांची निवड करण्यात आली होती. यामध्ये राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी बीड शहरातील यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थी प्रिय शिक्षिका श्रीमती मीरा बबनराव लांडगे मॅडम यांची निवड करण्यात आली होती. सदरील या मानाच्या पुरस्काराचे वितरण रविवार दिनांक ०४ मे रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाटचगृहामध्ये भव्यदिव्य कार्यक्रमात थाटामाटात दै लोकाशाचे संपादक विजयराज बंब, बीड तहसीलचे तहसीलदार चंद्रकांत शेळके,

नायब तहसीलदार सुहास हजारे, जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठविधीज्ञ जयंतराव राख, वाहतूक शाखेचे जिल्हा पोलीस निरीक्षक सुभाष सानप, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे मॅडम, वडवणीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, शालेय संस्थाचे अध्यक्ष



उत्तमराव पवार सर, शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा यशवंत विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक गणेश वाघ सर, शिरूर तालुक्यातील ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल जाधव, महाविद्यालय खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा साहित्यीक गौतम गायकवाड, पद्मपाणि प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा संपादक दिलीप तरकसे, प्रतिष्ठानच्या सचिव सिंधुताई तरकसे, सामाजिक कार्यकर्त्या सीमा ओस्तवाल मॅडम, समाज कल्याण वरिष्ठ निरीक्षक सहाय्यक आयुक्त कविता गायकवाड मॅडम, महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष नवनाथ पोटभरे, चंपावती विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य हौसराव पवार , रायमोहाचे विद्यमान सरपंच तथा उद्योजक सुभाष क्षीरसागर, लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, ॲड राजेश तांगडे, प्राचार्य देवीदास निकाळजे सर, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार इंगळे, शासकीय निवासी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता जावळे या प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन श्रीमती मीरा बबनराव लांडगे यांना सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीमती मीरा लांडगे मॅडम यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्षा सौ सुदामतीताई वाघ, संस्थापक सचिव श्री गोविंदरावजी वाघ, संस्थेचे अध्यक्ष तथा यशवंत विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक श्री गणेश वाघ सर, सचिव श्री नामदेवराव वाघ प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री धुमाळ सर यांच्यासह यशवंत विद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, नातेवाईक, मित्रपरिवार यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची बालवैज्ञानिक म्हणून निवड

कडा (प्रतिनिधी)

येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, महावीर इंग्लिश स्कूल या सी बी एस ई बोर्ड मान्यता प्राप्त शाळेतील शौर्य आंदुरे (इ.८वी), निशिता नहार ( इ-९ वी) आणि अक्षरा गांधी (इ -१०वी) या तीन विद्यार्थ्यांची वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (सी एस आय आर) जिज्ञासा. अंतर्गत एक दिवसीय बालवैज्ञानिक म्हणून निवड करण्यात आलेली आहे.







या तीन विद्यार्थ्यांची सी बी एस ई बोर्ड आणि एन सी ई आर टी ने मिळवून प्रथम चाचणी घेण्यात आली आणि त्यानंतर या विद्यार्थ्यांची सी एस आय आर अंतर्गत राष्ट्रीय प्रयोगशाळेत की जिथे भारताच्या पंतप्रधानांनी परवानगी दिलेल्या प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञांसोबत या विद्यार्थ्यांना नव - नवीन गोष्टी शिकायला मिळणार आहेत आणि त्याच बरोबर त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळणार आहे. पुणे रिजनल विभागातून फक्त ५० विद्यार्थ्यांची एक दिवसीय बालवैज्ञानिक म्हणून निवड करण्यात आलेली असून त्यामध्ये बीड जिल्ह्यातून फक्त महावीर इंग्लिश स्कूल च्या तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष- श्री अमितजी राठोड, उपाध्यक्ष- श्री. संदिपजी चानोदीया, सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष- श्री डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री मनीषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री. अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री. संतोषजी गांधी, मुख्याध्यापक - श्री अभिलाष के. के,सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### आम आदमी पार्टीची सुराज्य मोहीम मंगळवारी बीडमध्ये

# माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष

## आम आदमी पार्टी बीड

बीड (प्रतिनिधी)

आम आदमी पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सुराज्य मोहीम राबवण्यात येत आहे या बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अँड मनिष मोडक सचिव महाराष्ट्र राज्य . आम आदमी पार्टी व डॉ. अभिजीत मोरे प्रवक्ता आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य यांचें मार्गदर्शन महाराष्ट्रातील येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिल्ह्यातील उद्भवत असणारे प्रश्न नागरिकांशी संवाद कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढवणे आम आदमी पार्टी शी सर्व सामान्य नागरिकांना जोडण्याचा प्रयत्न करणे आम आदमी पार्टीचे उद्देश कार्यकर्त्यांच्या मार्फत सर्व सामान्य पर्यंत पोहोचवणे या सर्व बाबींवर ती चर्चा करण्यासाठी व पुढील येणाऱ्या निवडणुकांचे नियोजन ठरवण्यासाठी ही मोहीम संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ०१ मे. ते १५ मे. २०२५ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये राबवण्यात येत आहे या मोहिमेअंतर्गत ०६ मे २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे सकाळी ११ वाजता कार्यकर्त्यांना व सर्वसामान्य नागरिकांना चर्चा करून मार्गदर्शन केले जाईल तसेच पत्रकार परिषद घेऊन दुपारी ०२.०० वाजता बीड येथून स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख सरपंच मसाजोग येथे जाऊन येथील गावकऱ्यांची व देशमुख कुटुंबियांना सांत्वना भेट घेऊन पुढे लातूरकडे रवाना होईल तरी सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व सर्वसामान्य नागरिकांनी या बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत



# पाण्याअभावी फळबागा संकटात; श्रीगोंद्यातील शेतकरी हवालदिल

प्रतिनिधी @ अहिल्यानगर

श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांनी कुकडीच्या आवर्तनावर मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड केली होती. परंतु मोठ्या मेहनतीने सांभाळलेल्या फळबागा पाण्याअभावी डोळ्यासमोर जळू लागल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मोसंबी, द्राक्ष, डाळींब, केळी, संत्री आदी फळे गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर घेण्यात येतात. पाण्याविना या फळबागा जळाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

मशागतीसाठी केलेला खर्च निघाला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कुकडीचे पाणी वेळेत न आल्याने अनेक वर्षांपासून फळबागा जपलेल्या जळून चालल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांचा ऊस करपून गेला आहे. तर पाण्याअभावी कलिंगड अर्ध्यावर सोडून द्यावे लागले असल्याचे चित्र तालुक्यात दिसत आहे. दरम्यान शेतकऱ्यांचे हाल होत असताना दुसरीकडे लोकप्रतिनिधींकडून काही उपाययोजना केल्या जात नसल्याने बळीराजा हतबल झाला आहे.

श्रीगोंदा तालुक्यात सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. यावर्षी दमदार पाऊसच झाला नसल्याने विहिरींनी तळ गाठला आहे. परिसरातील ओढे, नाले, तलाव, कोरडे पडले असून पिण्याच्या पाण्यासाठी तालुक्यातील काही गावामध्ये ग्रामस्थांना टँकरची वाट पाहावी लागत आहे. शेतकऱ्यांना फळबागा जगवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत असल्याचे विदारक चित्र श्रीगोंदा तालुक्यात दिसत आहे.

५ हजार लिटरच्या टँकरसाठी ३ हजार

सध्या पाच हजार लिटरच्या लहान टँकर साठी २ ते ३ हजार रुपये शेतकऱ्यांना मोजावे लागत आहे. या पाण्यावर कशी तरी २००-३०० झाडे जगवता येत आहेत. तसेच तीव्र उन्हाळामुळे पाच ते सहा दिवसांनी पुन्हा पाणी द्यावे लागत असल्याने शेतकऱ्यांच्या खर्चात वाढ झाली आहे. फळबागा जगण्यासाठी पाणी विकत घेताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने बागा जगवणे अवघड झाले आहे.

कुकडीचे आवर्तन सोडण्याची मागणी

कशी करावी शेती ,पाणी मिळत नाही, मशागतीचा खर्चही निघत नाही, कुकडीचे आवर्तन वेळेवर सोडत नाहीत, सध्या पाणी नसल्याने फळबागा जळू लागल्या आहेत. फळबागा जगविण्यासाठी २ ते ३ हजार रुपये टँकरला मोजावे लागत आहेत. बागा जगविण्यासाठी शासनाने मदत करावी. कुकडी कॅनल चे आवर्तन सोडावे अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे

# मध्यरात्री पुण्याला हदरवणारं कांड

## बाईकवर महिलेचा मृतदेह घेऊन फिरत होता, पोलिसांनी हटवलं अन...

प्रतिनिधी @ अहिल्यानगर

शहराच्या गजबजलेल्या रस्त्यावर मध्यरात्री बाईकवर चक्क महिलेचा मृतदेह घेऊन फिरताणाच्या घटनेने पुणं शहर हादरलं आहे. पुण्यातील नांदेड सिटी पोलिस ठाण्याच्या हद्दीत एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. इथं मध्यरात्री दिडच्या सुमारास एक तरुण बाईकवर माहिलेचा मृतदेह घेऊन फिरत होता. यावेळी गस्तीवर असलेल्या पोलिसांनी त्याला हटकलं. त्याची विचारपूस केली असता पुण्याला हदरवणारं हत्याकांड समोर आलं आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्वरित कारवाई करत आरोपी तरुणाला बेड्या ठोकल्या आहेत.

राकेश रामनाय निसार असं अटक केलेल्या तरुणाचं नाव आहे. मध्यरात्री दिड च्या सुमारास आरोपी राकेश एका महिलेचा मृदेह दुचाकीवर समोर घेऊन फिरत असल्याचं पोलिसांच्या निदर्शनास आलं. यावेळी पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केली असता, संबंधित मृतदेह दुसरा तिसरा कुणाचा नव्हे तर त्याच्याच पत्नीचा असल्याचं तपासात निष्पन्न झालं. बबीता राकेश निसार असं मयत पत्नीचं नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री उशिरा आरोपी राकेश याने पत्नी बबीताचा गळा दाबून हत्या केली होती. पत्नीची हत्या केल्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तो चक्क दुचाकीवरुन प्रवास करत होता. तो पत्नीचा मृतदेह घेऊन भूमकर पुलाकडून स्वामीनारायण मंदीराच्या दिशेने निघाला होता. त्यावेळी आंबेगाव आणि भारती विद्यापीठ पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या.

मध्यरात्री दिड वाजता ही घटना उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली. आरोपीनं पत्नीची हत्या नेमकी का केली? याची कसलीही माहिती अद्याप समोर आली नाही. पोलिसांनी आरोपीला अटक केली आसून रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. पोलिस या घटनेचा सविस्तर तपास करत आहेत. मात्र, पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरात अशाप्रकारे तरुण करत आहेत. मात्र, पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरात अशाप्रकारे तरुण दुचाकीवर बायकोचा मृतदेही घेऊन फिरत असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे



बीड ।प्रतिनिधी

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ रोप्य महोत्सवी सोहळा दि. ७ जून २०२५ ते १४ जून २०२५ पर्यंत साजरा केला जाणार आहे. यानिमित्त परमपूज्य पंडित श्री प्रदीपजी मिश्रा महाराज( सिहोरवाले) यांची शिव महापुराण कथा होणार आहे. तसेच ग्रथराज ज्ञानेश्वरी परायण ज्ञान यज्ञ सोहळा संपन्न होणार आहे .त्यामुळे श्री क्षेत्र चाकरवाडी येथे लाखो भाविक भक्त येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे एस. टी. महामंडळ बीड सह जिल्ह्यातील सर्वच आगारातून चाकरवाडी साठी ज्यादा बसेस सोडण्यात याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, नितीन उपाध्ये ,नितीन जायभाय यांनी दि.५ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड व एस. टी .महामंडळ चे विभाग नियंत्रक श्रीमती दुसाने मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे

# निळवंडे कालव्याचा पाणी प्रश्न पेटला

## लाभधारक शेतकरी व अधिकाऱ्यांमध्ये हक्काच्या पाण्यासाठी शेतकरी संतप्त



पोलीस दल व अतिरिक्त पोलीस घटनास्थळी दाखल

संगमनेर खुर्द / संजय गोपाळे

संगमनेर तालुक्यातील निळवंडे कालव्याच्या पाण्यावरून लाभक्षेत्रातील शेतकरी व पाटबंधारे अधिकारी यांच्यात पाणी वाटपावरून संघर्ष निर्माण झाला आहे. निमगाव पागा, नांदुरी,निमज, धांदरफळ खुर्द, मिर्झापूर,निमगाव खुर्द या ठिकाणी लाभ क्षेत्रातील शेतकरी यांनी मोठा जमाव केला.

हक्काच्या पाण्यासाठी लाभक्षेत्रातील छोटी मोठी माती बंधारे भरण्यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांना मदत म्हणून पाईपलाईन द्वारे बंधारे भरण्यासाठी मोठी मदत केली परंतु पूर्वेकडील लाभ क्षेत्रातील शेतकरी यांना पाणी जात नसल्याने त्याही शेतकऱ्यांनी काल मोठे आंदोलन केले होते.परंतु संगमनेर तालुक्यातील दुष्काळी भागातून उजव्या कालवा गेला असल्यामुळे तरीही या शेतकऱ्यांना पाणी उचलायची किंवा माती बंधारे भरण्याची परवानगी नाही यासाठी आज निमगाव पागा निमगाव खुर्द, मिर्जापुर, नांदुरी दुमाला, निमज, धांदरफळ खुर्द, येथील शेतकऱ्यांनी एकत्र येत जोपर्यंत आमचे माती बंधारे भरून दिले जात नाही.तोपर्यंत आमच्या लाभ क्षेत्रातून पाणी जाऊ दिले जाणार नाही. प्रसंगी छातीवर गोळ्या सुद्धा झेलू परंतु आमच्या हक्काचे पाणी आम्हाला मिळाले पाहिजे यासाठी आज निमगाव खुर्द या ठिकाणी पाटबंधारे विभाग व शेतकऱ्यांमध्ये मोठा संघर्ष पहावयास मिळाला. प्रत्यक्ष शेतकऱ्याला हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे यासाठी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना लवकरात लवकर पोटचारी द्वारे पाण्याची व्यवस्था पाटबंधारे विभागाणे करावी अन्यथा आम्ही जलसमाधी घेऊ अशी टोकाचे भूमिका शेतकऱ्यांनी घेतली.निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी घेण्यासाठी टाकलेले पाईप काढण्यासाठी जलसंपदा विभागाकडून पोलीस बाळाचा वापर करून धाक निर्माण केला जात आहे. त्यामुळे ठिकठिकाणी लाभधारक शेतकरी आणि प्रशासन आमने सामने आले आहे. त्यामुळे संगमनेर मध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे.

संगमनेर तालुक्याच्या उजवा कालवा लाभक्षेत्रावरील विविध गावांमध्ये यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने जमा झालेले आहेत, पोलिसांनी देखील ही परिस्थिती हाताळण्यासाठी राज्य राखीव पोलीस दलाची अतिरिक्त कुमुक मागविल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी निमगाव बु, निमगाव खुर्द येथील शेकडो शेतकऱ्यांसह निमगाव पागेचे कामगार पोलीस पाटील राजेंद्र कानवडे, शेतकी संघाचे संचालक भास्कर गोपाळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष गोपाळे, माजी सरपंच बंडू कानवडे, निमगाव खुर्द से माजी सरपंच बाळासाहेब गोपाळे, मिर्जापुर चे सरपंच सतीश वलवे, नीमज चे सरपंच अरुण गुंजाळ, युवक कार्यकर्ते सतीश कासार, राजू कासार, सोपान कवडे, प्रवीण गोपाळे आदींसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

इंद्रजीत थोरात यांच्यावर गुन्हा दाखल,शेतकऱ्यांचा संताप अनावर

संगमनेर तालुक्यात निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यातील पाण्याचा वाद चिघळला असून, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. या कारवाईने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप पसरला असून, आम्हालाही सहआरोपी करा अशी मागणी करत त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शेतकऱ्यांसाठी लढणे गुन्हा आहे का?

जलसंपदा विभागाने यापूर्वीही शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. संगमनेर तालुक्याचे ४८ किमी लाभक्षेत्र असताना पाण्याबाबत अपेक्षित हमी दिली जात नाही.

# शिरूरचा एकविस वर्षीय युवा बनतोय जैन धर्माचा मुनी !

प्रतिनिधी @ शिरूर कासार

मराठवाड्यातून बहुधा पहिला एकविस वर्षिय युवा जैन धर्माची दिक्षा घेत असुन गुरूवार दि०१ में २०२५ रोजी मोठ्या उत्साहात भव्य शोभा यात्रा काढून दिक्षा पुर्व स्वागत समारोह कार्यक्रम शिरूर येथे संपन्न झाला. यावेळी संपुर्ण महाराष्ट्रातून जैन बांधवांसह शिरूर पंचक्रोशितील धर्मानुरागी उपस्थित होते. कार्यक्रमात आई-वडील, आजी-आजोबा,चुलते-चुलती व भाऊ असा संपूर्ण देसरडा परिवार अत्यंत भावूक झाला. एकविस वर्षीय हर्ष सर्व सुखाचा त्याग करून अत्यंत खडतर तपसाधनेसाठी धर्माच्या मुमुक्षू वाटेवरून मार्गस्थ होत असतांना मात्र उपस्थितांचा कंठ दाटून नेत्रातून न कळतपणे अश्रू ओघळून गेले .

निवासस्थानापासुन ही शाही मिरवणूक आयडीएल इंग्लिश स्कूल च्या भव्य प्रांगणात आल्यानंतर सर्वांनी देसरडा परिवाराचे धन्यवाद व्यक्त केले.या दिक्षा विदाई सोहळ्यास आलेल्या सर्वांचे स्वागत आणि सुरूची भोजन व्यवस्था करण्यात आली होती .

व्यापार ,सामाजीक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या या परिवाराचे मोठे योगदान असुन विद्यमान नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षा श्वेता प्रकाश देसरडा यांचा लाडला हर्ष हा सर्व श्रीमंती व सुख सुविधाला झुगारून अत्यंत खडतर मार्गावरून बुधवार दि ०७ मे २०२५ रोजी धुळे येथे जैन मुनींच्या सानिध्यात जैन मुनीची दिक्षा घेणार आहे. त्यानिमित्ताने शिरूर शहरात भव्य स्वागत समारोह आयोजीत केला होता .



धर्मानुसार चला !

स्वागत समारैहानंतर मुमुक्षू हर्ष देसरडा यानी सर्वांचा निरोप घेतांना आपापल्या धर्मानुसार वागा ,धर्माचे आचरण करून मिळालेल्या अनमोल देहाचे सार्थक करा असा संदेश दिला देसरडा परिवार यावेळी भावूक झाल्याचे दृष्य सर्वाच्या डोळ्यात अश्रू ढाळायला लावणारेच ठरले .महिला भगिनीची मोठी उपस्थिती होती .

शिरूरने चार जैन धर्माला दिले चार अनमोल रत्न !

आजवर शिरूरमधून लुनावत कुटूंबातील दोन मुली ,बाफना परिवारातील एक तर ललवानी कुटूंबाची नात अशा चार मुलींनी दिक्षा घेतली आहे , प्रथमच एकविस वर्षीय हर्षने मुलामधून प्रथमच जैन दिक्षा घेऊन शिरूरच्या नाव लौकिकात भर घातली आहे .

शिरूर कासार येथील देसरडा परिवारातील नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षा श्वेता प्रकाश देसरडा यांनी दोन मुलांपैकी एक मुलगा धर्मकार्यासाठी सुपूर्द केला. प्रत्येक मात्यापित्यांची इच्छा असते की आपल्या मुलाने संसारामध्ये चांगला संसार योग्य पद्धतीने करावा या मातापित्यांनी आपला अपत्यास हा भौतिक गोष्टीमध्ये न ठेवता परमार्थामध्ये सर्वोच्च पदासाठी मुलाला दान केले. येणाऱ्या काळामध्ये त्यांच्या अपत्याकडून जैन धर्मीय मार्गदर्शन व जैन धर्मांचे प्रचार आणि प्रसार कार्य योग्य पद्धतीने होणार आहे असा विश्वास चिरंजीव हर्ष यांच्या मातापित्यांना आहे. अनेक स्तरांतून शुभेच्छा वर्षाव होताना दिसत आहे.

# लोकपत्रकार बाप्पासाहेब भांगे एल एम के गौरव पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी @ वडवणी

बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर कामगाराचा मुलगा ते एकाच चॅनल चा संपादक. त्याच ऊसतोड मजुरांच्या संघटनेचा राज्य संघटक. असा खडतर प्रवास करत. भांगे यांनी हजार मजुरांचे प्रश्न सोडवले आहेत. त्याबरोबरच अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या टीव्ही टेन वादळ वार्ता न्युज या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या संपादन केला आहे. आणि त्याची पावती त्यांना मिळाली आहे.लेक माहेरचा कट्टा च्या माध्यमातून मराठवाड्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्यांना दिले जाणारे पुरस्कार जाहीर एकमेकींचे सुख आणि दुःख हितगुज सखीसोबत वाटुन घेवूया एकमेकींना साथ देऊया हे ब्रीद वाक्य घेवून लेक माहेरचा कट्टा च्या संस्थापिका सौ . सारिका प्रमोद ढाने यांचे साडेतीन लाख महिलांचे ग्रुप द्वारे संघटन सन २०१८ साली लेक माहेरचा कट्टा या ग्रुपच्या माध्यमातुन आपल्या कांही संचालिका सखींना सोबत घेवून या ग्रुपच्या संस्थापक / संचालिका सौ . सारिका प्रमोद ढाने यांनी विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचे ग्रुपच्या माध्यमातुन संघटन करून त्यांच्यातील सुप्त कला गुणांना वाव देणे , महिलांचे सर्वच क्षेत्रात सक्षीमीकरण करणे या उद्देशने या ग्रुपची सुरुवात केली आज त्याचे रूपांतर एक दोन नव्हे तर तब्बल साडेतीन लाख महिलांचे त्यांनी मोठे संगठन आपल्या कृतत्व कौशल्यातुन उभे केले आहे .प्रत्येक वर्षी लेक माहेरचा कट्टा आयोजित एल . एम .के . गौरव पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातुन ग्रुपच्या वतीने राजकीय ,सामाजिक , शैक्षणिक , शासकीय सेवा , प्रिन्ट मिडीया , इलेक्ट्रॉनीक मिडीयातील पत्रकार बांधवासाठीही विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला / पुरुष मान्यवरांचा या व्यासपिठावर त्यांना पुरस्कार देवून त्यांच्या सन्मान केला जातो .

दि . २५ मे २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यासाठी मराठवाड्यातील या मान्यवरांची विविध पुरस्कारासाठी लेक माहेरचा कट्टा च्या संस्थापिका सौ .सारिका प्रमोद ढाने यांनी निवड केली आहे या मध्ये धाराशिव जिल्ह्यामधुन सा . दै . देशभक्तचे संपादक लक्ष्मण ( तात्या ) शिंदे - पाटील , जयमहाराष्ट्र चॅनलचे रिपोर्टर उदय साबळे , टिव्ही ९ मराठी चॅनलचे श्रीराम क्षिरसागर , बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे युवा नेते आणि महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे विश्वासु एकनिष्ट कार्यकर्ते विशाल ज्ञानोबा पांचाळ , केज ,सरपंच गोरख भागूजी भांगे , डोका ,वसंत सोनवणे संपादक जनहित मराठी सेवा न्युज , विडा , तात्या लहु गवळी आदर्श क्रांती मराठी न्युज , नेकनुर , भागवत मुंडे युवा उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते अंबेजोगाई , टिव्ही टेन वार्ता संपादक परळी , बप्पासाहेब ज्ञानदेव भांगे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे .

# सैनिकी विद्यालयाचा ९५.२३ % निकाल सागर केळगंद्रे ९२.१७ गुणांसह सर्वप्रथम

बीड ।प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था राजुरी ( न.) संचलित सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ९५.२३ % निकाल लागला असून सागर केळगंद्रे हा विद्यार्थी ९२.१७ % गुणांसह प्रथम आला आहे, अशी माहिती सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री. सचिन पवार सर यांनी दिली आहे.

सैनिकी विद्यालय खुली तुकडीचे ४१ व आदिवासी तुकडीचे ४३ असे एकूण ८४ विद्यार्थी १२ वी सायन्स परीक्षेत प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सर्व ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ५१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. २८ विद्यार्थी प्रथम श्रेणी व ०१ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीमध्ये पास झाले आहेत. सागर संतोष केळगंद्रे हा राज्यस्तरीय तायक्कांदो खेळाडू १५ ग्रेस गुणांसह ९२.१७ % घेऊन सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे . वैभव आजिनाथ मंत्रे हा आदिवासी तुकडी वरील विद्यार्थी ८९.३३ गुणांसह द्वितीय व अमोल अच्युत शिंगारे हा ८७.८३ गुणांसह तिसरा क्रमांक आला आहे.नवगण शिक्षण संस्था राजुरी ( न.) संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर , डॉ. दीपाताई क्षीरसागर , संस्था मार्गदर्शक डॉ. योगेशभैय्या क्षीरसागर , डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह संस्था प्रशासक डॉ. व्ही.टी. देशमाने सर , डॉ. प्रा. सुधाकर गुट्टे सर व प्राचार्य सचिन पवार सर तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# भागुजीराव ढेकळे कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१%

प्रतिनिधी @ गेवराई

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१% एवढा लागला असून यावर्षी पण या कनिष्ठ महाविद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून बारावीच्या परीक्षेला २८९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २८५ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शेकडा निकाल ९८.६१% इतका लागला असून विज्ञान व वाणिज्य शाखेचा १००% तर कला शाखेचा ९५.७८% एवढा निकाल लागला. यात विशेष प्राविण्यात ११५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १४४, द्वितीय श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, प्रकाश राठोड, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस., सर्व कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# ध्वनी,चित्र, रंजन या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे अंबाजोगाईकरांना घडले लोककलेचे दर्शन

## कला व कलाकार ही तर समाजाची ऊर्जास्थाने - डॉ.राजेश इंगोले

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

कला व कलाकार ही त्या त्या देशाची, समाजाची ऊर्जास्थाने असतात. ज्यामुळे लोकांमध्ये प्रबोधन आणि क्रांतीचे विचार रूजविले जातात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. लोकनेते विलासराव देशमुख सभागृहात झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय व सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित वेव्ह २०२५ या कार्यक्रमांतर्गत आयोजित संगीत सोहळ्यात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी विचारमंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म्हणून अंबाजोगाईचे नायब तहसीलदार मिलिंद गायकवाड यांच्यासह तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, अभय जोशी व भीमाशंकर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते कलादेवतेचे प्रतिमापूजन व दीप प्रज्वलाने करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, भारत सरकार द्वारा आयोजित हा उपक्रम महाराष्ट्रामध्ये महायुती सरकार द्वारे प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. व महाराष्ट्रातील लोककलाकारांना एक सशक्त व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांचे अभिनंदन केले. कलेचा वारसा हा ऐतिहासिक असतो आणि विविध कलाकार इतिहासामध्ये आपली नोंद कलेच्या माध्यमातून करतात आणि आजरा अमर होतात. कला ही त्या कलाकाराला माणूस म्हणून समृद्ध करत असते आणि त्यामुळे कलाकार हे आपल्या आयुष्यात सदैव समाधानी, सुखी आणि आनंदी असतात असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त करत असे सांस्कृतिक कार्यक्रम महाराष्ट्र सरकार तर्फे वारंवार अंबाजोगाई मध्ये घेण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना मिलिंद गायकवाड यांनी शासन हे महाराष्ट्रातील कला व कलाकार यांना जागतिक पातळीवर घेऊन जात आहे असे मत व्यक्त केले. यानंतर झालेल्या चर्चासत्रात निषाद म्युझिक कंपनीचे प्रकाश बोरगावकर यांनी संगीत ही मोठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ झालेली आहे




आणि भारताकडे यासाठी लागणारी सर्व संसाधने आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय संगीताचा धबधबा आज ही कायम आहे. येथील तरूणांनी ही गोष्ट लक्षात घेऊन आपल्या जीवनाचे करिअर संगीत क्षेत्रात घडविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरूवात प्रख्यात शाहीर तुकाराम सुवर्णकार यांच्या 'जय जय महाराष्ट्र माझा' या गाण्याने झाली. यावेळी २०२५ ची ध्वनिचित्रफीत सगळ्यांना दाखवून यावर चर्चासत्र संपन्न झाले. या कार्यक्रमात पोवाडा जागरण गोंधळ लोकगीते स्थानिक कलाकारांची चर्मवाद्यांवर जुगलबंदी महाराष्ट्र गीत स्थानिक लोककला लोकधारा शाहिरी गीते जनप्रबोधनपर गीते यांचे प्रभावी सादरीकरण झाले. यावेळी अनेक कलाकारांनी आपल्या गायन नृत्य गोंधळी कला यांचे उत्कृष्ट प्रदर्शन करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक समन्वयक प्रवीण जोगदंड यांनी तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.अनंत कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगेश म्हेत्रजकर, राजकुमार गायके, महेश वेदपाठक, आकाश चौरे, मंगेश भिसे, डॉ.प्रवीण केदार यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.पवन मुंडे यांचे उच्च वैद्यकीय शिक्षण परीक्षेत यश

प्रतिनिधी @ परळी

परळी तालुक्यातील पांगरी या गावातील युवकांनी यशा मागून यश खेचून आणत पांगरी गावच्या वैभवात सातत्याने मानाचा तुरा खोवला आहे. काही दिवसांपूर्वीच यूपीएससीमध्ये डॉ. अक्षय मुंडे झळकला आहे. त्या यशाचा आनंदोत्सव अद्याप सुरू असतानाच पांगरी गावातील दुसऱ्या डॉ. पवन मुंडे या भूमिपुत्राने वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत घवघवीत यश मिळवून पांगरीकरांच्या आनंदात दुग्ध शर्करा योग घडवून आणला आहे. सुपर स्पेशलिटी नीट मध्ये डॉ. पवन मुंडे यांनी यश मिळवले असून त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.पांगरी गावचे रहिवासी असणारे डॉ. पवन बंडोपंत मुंडे नीट सुपर स्पेशालिटी २०२५ परिक्षा घवघवीत यश संपादन करून उत्तीर्ण झाले आहेत. या परिक्षेतभारतात ९३९ रँक त्यांनी मिळवला आहे. डॉ पवन मुंडे यांचे प्राथमिक शिक्षण नांदेड मध्ये झाले. नीट परीक्षा उत्तीर्ण झाल्यांतर त्यांचे एमबीबीएसचे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ येथे झाले.



एमबीबीएस चे शिक्षण घेत असताना शस्त्रक्रिया या विषयामध्ये त्यांना आवड निर्माण झाली. त्यांतर त्यानी आपले शस्त्रक्रियाचे शिक्षण (एमएस सर्जरी) हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धुळे येते पूर्ण केले.धुळे येथे शिक्षण सुरु असतानाच त्यानी सुपर स्पेशालिस्ट नीट परीक्षेची तयारी केली व पहिल्याच प्रयत्नात ते ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. पुढील शिक्षण यूरोलॉजि मध्ये घेण्यास इच्छुक असून किडनी ट्रान्सप्लांट मध्ये स्पेशालिटी करून रुग्ण सेवा करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. डॉ. प्रदीप सारूक हे त्यांचे भावजी असुन ते किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन म्हणुन छ. संभाजी नगर येथे सिग्मा हॉस्पिटल येथे प्रॅक्टिस करतात. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच नीट परीक्षेत यश मिळाल्याचे डॉ. पवन मुंडे यांनी सांगितले.

पोलीसपुत्राचे घवघवीत यश..

डॉ. पवन हे पोलीसपुत्र आहेत. त्यांचे वडील बंडोपंत मुंडे यांनी अनेक वर्षे महाराष्ट्र पोलीस दलात कर्तव्य बजावलेले आहे. सेवानिवृत्त पोलीस उपनिरिक्षक बंडोपंत मुंडे व त्यांच्या पत्नीने अतिशय जबाबदारीने तीनही मुलांना घडवले. एक मुलगा व दोन मुली तिघेही डॉक्टर झाले. डॉ. पवन यांनी तर वैद्यकीय शिक्षणात सुपर स्पेशालिटीपर्यंत झेप घेतली आहे. आपल्या आई वडीलांचे कष्ट व स्वप्न पुर्ण करण्याची भावना डॉ. पवन यांनी व्यकत केली आहे.

# प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे - आ.सुरेश धस

## विवाह समारंभामध्ये शुभ आर्शिवाद देतांना आ.सुरेश धस यांचे आवाहन

प्रतिनिधी @ आष्टी

सध्या माणसे गरमीपासून दिलासा मिळावा म्हणून झाडांचा आधार घेत आहेत. तापमान सध्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. यासाठी पर्यावरणाचा समतोल कायम राखण्यासाठी वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावावे आणि त्याचे संगोपन करावे, असे आवाहन विविध लग्न समारंभात आर्शिवाद देतांना आष्टी - पाटोदा - शिरुर मतदार संघाचे आ. सुरेश आण्णा धस हे करत आहेत.

झाडांपासून सर्वच माणसांना प्राणवायू मिळतो. सध्या माणसे गरमीपासून दिलासा मिळावा म्हणून 'एसी' वापरतात. त्यासाठी विजेच्या बिलाचा भरणा करतात. दुसरीकडे एक रोपटे फुकट मिळेल काय, अशी विचारणा करतात. हे योग्य नाही. आपण सावली मिळावी, म्हणून झाड शोधतो, पण झाड लावण्याचा कधीच विचार करीत नाही. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून रोपट्यांचे योग्य संगोपन केल्यास सर्वांचे आरोग्य चांगले राहील. त्यामुळे नागरिकांनी वृक्षलागवड करावी.

पृथ्वी ही आपली आई आहे आणि निसर्ग आपले जीवन आहे. निसर्गाशिवाय मानवी जीवन शक्य नाही, परंतु तरीही आपण विकासाच्या आणि आधुनिकतेच्या शर्यतीत पर्यावरणाची हानी करत आहोत. आपण निसर्गापासून दूर जात आहोत. आपल्याला वेळोवेळी पर्यावरणाची हानी होण्याचाही फटका बसत आहे. कधी पूर येतो तर कधी ढग फुटतात. कुठेतरी पृथ्वीवर पाण्याचा दुष्काळ पडत आहे तर कुठे जमीन आग



ओकत आहे हे सर्व केवळ हवामान बदलामुळे घडत आहे. झाडे तोडल्यामुळे हवा इतकी प्रदूषित झाली आहे की, शहरामध्ये श्वास घेणे कठीण झाले आहे. शहरांचे जीवन, पर्यावरण आणि निसर्गापासून कोसो दूर झाले आहे. येथे राहणाऱ्या लोकांना असे आजार होत आहेत जे याआधी लोकांनी कधी ऐकले नाहीत किंवा पाहिलेही नाहीत. या सगळ्याचे कारण कुठेतरी आपली ढासळलेली जीवनशैली आहे. विश्वाचे वाढते तापमान, पर्यावरणाचा ढासळत चाललेला समतोल, पर्यावरण प्रदूषण, नागरिकांचे वाढत असलेले आजार, कोरोना सारख्या महामारीचा हैदोस, निसर्गात अनपेक्षितपने घडणाऱ्या घटना व प्रसंग या मागे महत्त्वाचे कारण म्हणजे मानवा करवी होणारी प्रचंड वृक्षतोड होय. या सर्व बाबींचा योग्य विचार झाला पाहिजे.

म्हणूनच आ. सुरेश आण्णा धस विविध लग्न समारंभात नववधू - वरांना शुभ आर्शिवाद देतांना लोकांना आवाहन करताहेत की, प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे. याचा प्रत्येक नागरिकांनी विचार करण्याची काळाची गरज आहे.



# वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी केले वैभवी देशमुख चे अभिनंदन,रोपटे देउन केला सन्मान

प्रतिनिधी @ केज

काल इयत्ता १२ वि चा निकाल लागला आहे. आणि मंगळवारी दि.६ मे २०२५ रोजी संघर्ष कन्या वैभवी संतोष देशमुख चा वाढदिवस होता.त्यानिमित्त मस्साजोग ला जाऊन तिचा बहवा वृक्षाचे रोपटे देऊन तिचा सत्कार केला.आणि तिच्या वाढदिवसाच्या निमित्त वृक्षमित्र अभियान अंतर्गत चालवण्यात येत असलेल्या संत तुकाराम महाराज रोपवाटीकेतर्फे एक हजार रोप भेट देण्याचे जाहीर केले या प्रसंगी उपस्थीतीत धनंजय भैया देशमुख, राजेसाहेब देशमुख, वृक्षमित्र सुधाकर देशमुख,सामाजिक कार्यकर्ते ईश्वर भैय्या शिंदे,मदनलाल परदेशी, अमर शिंदे उपसरपंच गिता,साळुंके दादा आदी मान्यवर उपस्थित होते.

# केज येथे मल्टिस्टेट ठेवीदारांचे आक्रोश आंदोलन,ठेवी परत मिळाव्यात यासाठी तहसील कार्यालयास दिले निवेदन

प्रतिनिधी @ केज

ज्ञानराधा,साईराम, राजस्थानी,छत्रपती मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीमधील ठेवीदारांनी त्यांच्या ठेवी परतमिळाव्यात यासाठी केज तहसील कार्यालयात निवेदन दिले आहे.गेल्या दोन वर्षांपासून ही मल्टिस्टेट संस्था बंद असून असंख्य ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत.यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून,शिक्षण, औषधे,लग्न,शेती, व्यवसाय यासाठी लागणारे पैसे मिळत नसल्याने सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.अस्वले किरण शंकर आणि इतर ठेवीदारांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की,संबंधित संस्थेच्या संचालक मंडळाची चौकशी करून त्यांच्या मालमत्तेची जप्ती करण्यात यावी व ठेवीदारांचे पैसे परत मिळवून द्यावेत.या आधी संबंधित मंत्र्यां कडे व प्रशासनाकडे निवेदने दिली असली तरी काहीच कारवाई झाली नाही,अशीही तक्रार करण्यात आली.

ठेवीदारांनी प्रशासना कडे मागणी केली की,संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांना तात्काळ



अटक करावी.त्यांची संपत्ती जप्त करून ठेवीदारांना पैसे परत द्यावेत.बेकायदेशीर विकलेली मालमत्ता, वाहने यांचीही चौकशी व्हावी.या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे,अशी ठेवीदारांची अपेक्षा आहे.ठेवीदारांनी कानडी रोड ते तहसील कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला व नायब तहसीलदार श्रीमती आशा वाघ यांना निवेदन देण्यात आले आहे.

# आ. विक्रम पाचपुते यांना न्यायालयाचे पकड वॉरंट; कारण काय?

प्रतिनिधी @ अहिल्यानगर

श्रीगोंदा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आणि साईकृपा शुगर ण्ड अलाईड लिमिटेड, हिरडगावचे तत्कालीन अध्यक्ष आ. विक्रमसिंह बबनराव पाचपुते आणि कारखान्याचे व्यवस्थापक यांना धनादेश अनादरप्रकरणी श्रीरामपूर न्यायालयाने पकड वॉरंट बजावले आहे. श्रीगोंदा पोलिसांकडून वॉरंट बजावणी होत नसल्याने ते न्यायालयात उपस्थित राहत नाहीत.

श्रीरामपूरमधील अशोक सहकारी साखर कारखान्याला दिलेला २० लाख रुपयांच्या धनादेश अनादर प्रकरणात श्रीरामपूर न्यायदंडाधिकारी क्रमांक दोन याच्यांसमोर सुरू असलेल्या दाव्यात साईकृपाचे तत्कालीन अध्यक्ष म्हणून आ. विक्रम पाचपुते आणि कारखाना व्यवस्थापक यांना पकड वॉरंट बजावण्यात आले आहे. श्रीरामपूर न्यायालयाने श्रीगोंदा पोलीस निरीक्षकांना दोघांना पकडून न्यायालयासमोर उपस्थित करण्याचा आदेश दिला आहे.

दरम्यान, माजी आ.बबनराव पाचपुते यांच्या कुटुंबाचा मालकी हक्क राहिलेला आणि आता गौरी शुगरचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील यांच्याकडे असलेला हिरडगावच्या साईकृपा साखर कारखान्याच्य जुन्या अडचणी अद्यापही पाचपुते कुटुंबाची पाठ सोडतांना दिसत नाहीत. आ. विक्रम पाचपुते आणि कारखान्यांचे व्यवस्थापक धनादेश अनादर प्रकरणात न्यायदंडाधिकारी वर्ग न्यायालय क्रमांक दोन यांनी पकड वॉरंट बजावले आहेत. श्रीगोंदा पोलिसांनी या दोघांना पकडून माझ्यासमोर हजर करावे. यात कोणतीही चूक होता कामा नयेत, असे पकड वॉरंटमध्ये म्हटले आहे

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून वैभवी देशमुख हिच्या बारावी परीक्षेतील यशाबद्दल अभिनंदन

प्रतिनिधी @ मुंबई

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हीने अत्यंत कठीण, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जात इयत्ता बारावी परीक्षेत विज्ञान शाखेतून ८५.३३ टक्के गुण मिळविल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिचे अभिनंदन केले आहे. वैभवीने मिळविलेल्या यशाने तिच्या अंगभूत गुण, हुशारी, धैर्य, संयम, जबाबदारीच्या जाणीवेचं दर्शन घडल्याचे सांगून तिच्या यशाने महाराष्ट्राला आनंद झाला आहे, अशा शब्दात त्यांनी तिचे कौतुक केले आहे.

वैभवी देशमुख हिला पाठविलेल्या अभिनंदनपर पत्रात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे की, इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत विज्ञान शाखेत ८५.३३ टक्के गूण मिळवून तू उत्तीर्ण झाल्याचे समजून माझ्यासह संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला आहे. वडील दिवंगत संतोष देशमुख यांच्या मृत्यूनंतर अत्यंत दु:खद, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जात मिळवलेले यश तुझ्या अंगभूत गुण, हुशारी, धैर्य, संयमाचे, जबाबदारीच्या जाणीवेचे दर्शन घडवणारे आहे. तुझ्या यशातून राज्यातील इतर विद्यार्थ्यांना लढण्याची, यशस्वी होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास आहे. तुझ्या यशाने वडील स्वर्गीय संतोष देशमुख यांना खुप आनंद झाला असता. तुझ्या कष्ट, जिद्दीला सलाम. यापुढेही शैक्षणिक कारकिर्दीत, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर तुला असंच यश मिळत राहो, आम्ही सर्व कायमच तुझ्यासोबत आहोत, असा विश्वास देत उपमुख्यमंत्री पवार यांनी तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# जीवन शिक्षण उच्च माध्यमिक विद्यालय गांजपूरचा निकाल १००%

## गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव प्रा. ईश्वर मुंडे यांनी केले कौतुक

**किल्ले धारूर/अविनाश जगताप**

**धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १२ वी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून विज्ञान शाखेतून कु. वडगावकर संयुक्ता सुधीर ८५.१७ % प्रथम,चि. कोठावळे समर्थराजे अश्रुबा ८५.००% द्वितीय,कु.गायके यशश्री दिगंबर ८३.८३% तृतीय,कु.गुंडेवार गौरी गजानन ८३.८३ % तृतीय,कु. चोले सुलोचना मोहनराव ८३.६७ % गुण मिळवून चौथा क्रमांक मिळवला आहे.**

तसेच कला शाखेचा निकाल ९८.९०% लागला असून कला शाखेतून कु. तिडके मंगल सुनील ७५.१७ % प्रथम,कु.मुंडे पूजा बालासाहेब ७४.३३ % द्वितीय,कु. राठोड प्रीती गोविंद ७४.३३% द्वितीय,कु.लांब अंजली संदिपान ७३.१७ % तृतीय,कु.सुरवसे तेजस्विनी विलास ७२.३३ % हिने चौथा क्रमांक मिळवला आहे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यशाची परंपरा जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,गांजपुर येथील विद्यार्थ्यांनी राखली आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे ईश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव प्रा ईश्वर मुंडे ,प्राचार्य विजयकुमार मुंडे, प्रा.दिपक साखरे, उपमुख्याध्यापक अरुण समुद्रे, सहशिक्षक महादेव केदार, सौ मंगल वटाणे ,नाथा ढगे, सौ भारती सोनवणे, हनुमंत काळे, प्रमोद कोमटवार, पोपट कदम इत्यादींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# जनतेचे प्रश्न मांडणारा कुठलाच पक्ष राहिला नाही आम आदमी पार्टी

## लोकांना बोलकं करण्यासाठी आम आदमीची सुराज्य मोहीम यात्रा बीडचे प्रश्नही समजून घेणार- मोडक

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्रामध्ये सर्वपक्षीय सरकार आहे. त्यामुळे जनतेचे प्रश्न मांडणारा पक्ष राहिला नसल्याचे स्पष्ट करत महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न समजून घेण्यासाठी आम आदमी पार्टीच्या वतीने १ मेपासून सुराज्य मोहीम यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. ही यात्रा साडेचार हजार किलोमीटर पालणार असून बीड जिल्ह्यातीत जनतेचे प्रश्न देखील आम्ही समजून घेणार असल्याची माहिती आम आदमी पार्टीचे राज्य संघटक ॲड. मनीष मोडक यांनी दिली आम आदमी पार्टीची सुराज्य गोहीम यात्रा आज बीडमध्ये आलीअसता राज्य संघटक मंत्री ॲड. मनीष मोडक राज्य सचीव अभिजीत मोरे यांनी शासकीयविधानगृह येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी ते अशोक येडे सह आर्दीची उपस्थिती होती. पुढे बोलताना ॲड. मोडका जिला अध्यक्ष



म्हणाले की , राज्यातील जनते चे प्रश्नरामजून घेताना कुछलाही पक्ष राहिलेला नाही. सर्वपक्षीय सलेमध्ये सहभागी

झालेले आहेत. जनतेचे अनेक प्रश्न आहेत, हे प्रश्न समजून घेण्यालाती आग आदमी पार्टीच्या वतीने सुराज्य पत्रीकरण्यात आली आहे या यात्रेची सुरुवात १ मे रोजी चंद्रपूर जिल्ह्यातून झालेली आहे. छवीस जिल्ह्यात सांबार हजार कि. मी. यात्रा चालणार असल्याची माहिती मोडक यांनी दिली असून ते पुढे म्हणाले की, बीड जिल्ह्यातही अनेक समस्या आहेत. शहरामध्ये पाण्याचा प्रश्न आहे. शहरातले प्रश्न आम्ही जाणून घेणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन

## महिला व युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा - मिनाक्षीताई देवकते (डोमाळे)

प्रतिनिधी @ बीड

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे २०२५ रोजी त्रिशताब्दी जयंती आहे. त्या निमित्त धनगर समाज अहिल्या महिला आघाडी आणि बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.१० ते ३१ मे २०२५ या कालावधीत महिला व युवतींसाठी मोफत लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून बीड शहरातील महिला व युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांनी केले आहे.

ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज उत्तम आणि महान राजे होते त्याच प्रमाणे अहिल्यादेवी होळकर या देखील स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होत्या. यावर्षी महाराष्ट्रासह भारतात त्यांची त्रिशब्दी



जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. याच अनुषंगाने महिला व युवतींवर होणार्या अन्याय,अत्याचारावर वचक बसावा आणि महिला व युवती या निर्भिड व्हाव्यात यासाठी बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने दि.१० मे २०२५ पासून छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायं.५ ते ६ या वेळेत लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. २८ मे रोजी रांगोळी स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली असून स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळावा यासाठी निबंध स्पर्धा देखील घेण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर महिला, युवक, युवतींनी तसेच विद्यार्थ्यांनी दि.३१ मे २०२५ पर्यंत आपले निबंध बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था कार्यालय पिंपरगव्हाण रोड, काळे कॉम्प्लेक्स इमारत येथे द्यावेत अधिक माहितीसाठी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते-डोमाळे, मो. ९०७५५५८८०७, ८२३७९१९१६२ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.